नाशिक महानगरपालिका, नाशिक
घनकचरा व्यवस्थापन विभाग
दुरध्वनी क्रमांक:- ०२५३ २५७२०६२ राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.-४२२००२ E mail ID- dir_swm@nmc.gov.in

जा.क्र./घ.व्य.वि./कार्या.क्र.२/कामाचा आदेश/ ०४ /२०२५ दिनांक १२/११/२०२५

**कामाचा आदेश (Work Order)**

**प्रति,**
**ग्लोबोल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि.**
२०/२१, पहिला मजला, १० अतुल निवास,
७ काठीयावाडी लेन, मुंबई-४००००४

**विषय:** गोदावरी नदीकाठचा भाग – होळकर पुलापासुन कपिला संगमापर्यंत येथील सामुदायीक शौचालये, सार्वजनीक शौचालये, नाशिक महानगरपालिकेच्या पंचवटी, सातपूर, नविन नाशिक व नाशिकरोड विभागातील शाळा/ विद्यालयातील शौचालये, दादासाहेब फाळके स्मारक, कालीदास कलामंदिर, महात्मा फुले सभागृह, सदाशिव भोरे सभागृह (हिरावाडी), पंडीत पलुस्कर सभागृह (मालेगांव स्टँड, पंचवटी), नाशिक महानगरपालिकेचे जलतरण तलाव, मनपा मुख्यालय राजीव गांधी भवन, नाशिक महानगरपालिकेचे विभागीय कार्यालय –नविन नाशिक, नाशिकरोड, सातपूर, पंचवटी इत्यादी येथील साफसफाईचे कामकाज इत्यादीठिकाणांची साफसफाई व स्वच्छता कामकाज करणेकामी बाहयंत्रणेद्वारे कंत्राटदाराकडून २१९ कंत्राटी मनुष्यबळ तीन वर्ष कालावधीकरीता उपलब्ध करून घेऊन कामकाज करुन घेणे बाबत

**संदर्भ:-** १. मा.महासभा पारीत ठराव क्र.२१२, दिनांक ०५.०८.२०२५
२. ई-निविदा सुचना क्रमांक ०५/२०२५-२६
३. आपण सादर केलेले आर्थिक देकार
४. आपले दिनांक ०१/१०/२०२५ रोजीचे L१ दराने काम करण्यास तयार असल्याचे पत्र
५. मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ३५३ दिनांक १४/१०/२०२५
६. आपण दिनांक १२/११/२०२५ रोजी नाशिक महानगरपालिकेसमवेत केलेला करारनामा

उपरोक्त विषयांकीत कामाकरीता ई-निविदा सुचना क्र. ०५/२०२५-२६ प्रसारीत करणेत आली होती. सदर कामी आपण निविदा सादर केलेली असुन त्याकामी संदर्भ क्र. ३ अन्वये दर सादर केलेले आहेत. सदर कामी आपण सादर केलेले दर हे L३२ आसल्याने निविदा अटीशर्तीनुसार L१ यांचे (Service Charges ३.८५% + Overhead Charges ३.५०%) या न्युनतम निविदा दराने काम करणेस आपण तयार असल्याबाबत आपणास विचारणा केली असता आपण संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये संमती दिली आहे.

त्यानुसार एकुण मनुष्यबळ पैकी आपणास २५% मनुष्यबळ म्हणजेच २१९ मनुष्यबळ आपणाकडून उपलब्ध करुन घेऊन कामकाज करणेस, करारनामा करणेस व त्याकामी येणारा खर्च र.रु. र.रू. २६,१३,१९,२१५/- (सव्वीस कोटी तेरा लक्ष एकोणावीस हजार दोनशे पंधरा मात्र) यास संदर्भ क्र. ५ अन्वये वित्तीय मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार आपण सुरक्षा अनामत म्हणून कोटक महिंद्रा बँक लि. बँकेची बँक गॅरंटी नं. 1379IGP251117323 दि.04/11/2025 र.रु. 52,26,384/-ची दिलेली आहे. तसेच संदर्भ क्र. ६ नुसार करारनामा करुन दिलेला आहे.

तरी विषयांकीत कामाकरीता आपण २१९ मनुष्यबळ दि.०१/१२/२०२५ रोजीपासुन पुरविण्यात यावे व या कामीचे निविदा व करारनामा अटीशर्तीनुसार कामकाज करावे. सदर कामाची मुदत दि.३०/११/२०२८ पावेतो राहील. कामकाजाच्या सुचना उपआयुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, संबंधीत विभागाचे विभागीय अधिकारी व विभागीय स्वच्छता निरीक्षक यांचेकडून घ्याव्यात.

मा. आयुक्त तथा प्रशासक महोदया यांचेकडील
दिनांक ०३/११/२०२५ रोजीची मान्यता

(अजित निकत)
उपआयुक्त तथा संचालक
घनकचरा व्यवस्थापन विभाग
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**प्रत:- माहितीसाठी सविनय सादर**
१. मा. आयुक्त तथा प्रशासक सो., मनपा,नाशिक
२. मा. अतिरिक्त आयुक्त (१), मनपा, नाशिक

**प्रत:- माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव**
संबंधीत विभागीय अधिकारी/ विभागीय स्वच्छता निरीक्षक